अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या मान्यतेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ पासून राज्यातील विद्यमान कायम विनाअनुदानित अभियांत्रिकी, एचएमसीटी, व्यवस्थापनशास्त्र, एमसीए अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थेतील अभ्यासक्रम बंद करणे, सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत घट करणे व अभ्यासक्रम विलिन करणे इ.साठी शासन मान्यता देणेबाबत....

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्र. टीईएम-२०२१/प्र.क्र.१२५/तांशि-४,

खो.क्र.४३८, चौथा मजला,मादाम कामा मार्ग,

हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : १० ऑगस्ट, २०२१.

वाचा : संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र. २/एनजीसी/मान्यता/२०२१/६५२, दिनांक २६/०७/२०२१.

**प्रस्तावना :**

संचालक, तंत्रशिक्षण यांनी वर नमूद दिनांक २८/७/२०२१ च्या पत्रान्वये विद्यमान कायम विनाअनुदानित अभियांत्रिकी, एचएमसीटी, व्यवस्थापनशास्त्र, एमसीए अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थेतील अभ्यासक्रम बंद करणे, सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत घट करणे व अभ्यासक्रम विलिन करणे इ.साठी शासन मान्यता देण्यासाठी प्रस्तावित केले आहे.

संचालक, तंत्रशिक्षण यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सोबतच्या Annexure "A" मधील संस्थांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे विद्यमान कायम विनाअनुदानित अभियांत्रिकी, एचएमसीटी, व्यवस्थापनशास्त्र, एमसीए अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थेतील अभ्यासक्रम बंद करणे, सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत घट करणे व अभ्यासक्रम विलिन करणे इ.साठी शासन मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरून संचालक, तंत्र शिक्षण यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे, शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ पासून सोबतच्या Annexure "A" मधील संस्थांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे विद्यमान कायम विनाअनुदानित अभियांत्रिकी, एचएमसीटी, व्यवस्थापनशास्त्र, एमसीए अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थेतील अभ्यासक्रम बंद करणे, सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत घट करणे व अभ्यासक्रम विलिन करणे इ.साठी खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

PRINCIPAL
SINHGAD INSTITUTE OF TECHNOLOGY
Kusgaon (Bk.), Lonavala - 410 401

ATTESTED

१) या संस्थेतील बंद करावयाच्या अभ्यासक्रमांच्या संबंधित सर्व दस्तऐवज जसे की गुणपत्रिका, उत्तरपत्रिका, निकालपत्रे, विद्यार्थ्यांचे पत्ते, फीच्या पावत्या इत्यादी बाबी संस्थेने संबंधित विद्यापीठाकडे सुपूर्द करणे आवश्यक राहील.

२) संबंधीत अभ्यासक्रमासाठी नियुक्त शिक्षक वर्ग/कर्मचारी यांच्या सेवाविषयक व इतर बाबतीत न्यायप्रविष्ठ असलेली सर्व प्रकरणांची जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील. भविष्यकाळात कोणतेही न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्यास सर्वस्वी संस्था जबाबदार राहील.

३) संस्थेकडून शासनाची वसुली अद्यापी थकबाकी असल्यास त्याचा भरणा करणे संस्था प्रमुखांवर बंधनकारक राहील.

४) संस्थेमध्ये सदर अभ्यासक्रम राबविण्यासाठी आवश्यक स्थावर जंगम मालमत्तेविषयी या संस्थेने शासनाकडून किंवा कोणत्याही वित्तीय संस्थेकडून कर्ज घेतलेले असल्याचे यापुढे निदर्शनास आल्यास त्याची परतफेड करण्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील.

५) संस्थेतील संबंधित अभ्यासक्रम टप्प्याटप्प्याने बंद करताना त्या संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांना व माजी विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देण्याची व परिक्षेस बसण्याची व्यवस्था करणे संस्थेवर बंधनकारक राहील. संस्थेने या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन न दिल्यास , संस्थेविरुध्द नियमानुसार कारवाई करण्यात येईल व शासनाकडे ठेवलेली संचित ठेव शासन जमा करण्यात येईल.

६) संबंधित अभ्यासक्रमासाठी नियुक्त केलेल्या संस्थेतील शिक्षक व कर्मचारी यांना नियमानुसार देय असलेले वेतन, वेतन भरपाई व अन्य आर्थिक प्रदानांचे भुगतान करणे संस्थेस बंधनकारक राहील.

२. ज्या संस्थांनी संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे प्रोसेसिंग फी अदा केलेली नाही, त्या संस्थांकडून संचालकांनी अंतिम मान्यता देण्यापूर्वी ती वसूल करावी व या शासन मान्यतेनुसार संचालक, तंत्र शिक्षण यांनी आवश्यक ते आदेश पुढील १५ दिवसाच्या आत निर्गमित करावेत.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२१०८१०१३४६५८९२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ATTESTED

PRINCIPAL
SINHGAD INSTITUTE OF TECHNOLOGY
Kusgaon (Bk.), Lonavala - 410 401

Sanjay Audumbar Dharurkar

( संजय औ. धारुरकर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२. सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).

३. सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)

४. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड

५. संबंधित संस्था (संचालक,तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)

६. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१.

७. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), नवी दिल्ली.

८. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई.

९. निवड नस्ती/तांशि-४.

ATTESTED

PRINCIPAL
SINHGAD INSTITUTE OF TECHNOLOGY
Kusgaon (Bk.), Lonavala - 410 401

SINHGAD INSTITUTE OF TECHNOLOGY ★ LONAVALA 410 401

| Sr. No. | Institute Code | Permanent Id | Institute Name | Institute_Address | District | Minority Institute | Women Institute | Program | University | Level | Name of Course | Intake Approved for 2020-21 | Intake Approved for 2021-22 | Variation | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 152 | 6185 | 1-5285631 | SINHGAD INSTITUTE OF TECHNOLOGY | GAT NO.309/310, OFF MUMBAI-PUNE EXPRESSWAY, KUSGAON (BK), LONAVALA, TAL - MAVAL, DIST - PUNE | PUNE | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | University of Pune, Pune | UNDER GRADUATE | MECHANICAL ENGINEERING | 240 | 210 | -30 | Decrease |
| 153 | 6185 | 1-5285631 | SINHGAD INSTITUTE OF TECHNOLOGY | GAT NO.309/310, OFF MUMBAI-PUNE EXPRESSWAY, KUSGAON (BK), LONAVALA, TAL - MAVAL, DIST - PUNE | PUNE | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | University of Pune, Pune | UNDER GRADUATE | ELECTRONICS & TELE-COMMUNICATION ENGINEERING | 120 | 90 | -30 | Decrease |
| 154 | 6186 | 1-13327111 | INDSEARCH INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES & RESEARCH | S.NO. 37/2/2/4, BAVDHAN KHURD, PUNE-411021 | PUNE | N | N | MANAGEMENT | University of Pune, Pune | POST GRADUATE | MMS | 90 | 30 | -60 | Division Closure |
| 155 | 6187 | 1-4676331 | SINHGAD ACADEMY OF ENGINEERING | S.NO. 40, KONDHWA(BK), KONDHWA-SASWAD ROAD, NEAR PMC OCTROI POST, PUNE-411048, MAHARASHTRA | PUNE | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | University of Pune, Pune | UNDER GRADUATE | ELECTRONICS AND TELECOMMUNICATIONS ENGINEERING | 120 | 90 | -30 | Decrease |
| 156 | 6187 | 1-4676331 | SINHGAD ACADEMY OF ENGINEERING | S.NO. 40, KONDHWA(BK), KONDHWA-SASWAD ROAD, NEAR PMC OCTROI POST, PUNE-411048, MAHARASHTRA | PUNE | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | University of Pune, Pune | UNDER GRADUATE | MECHANICAL ENGINEERING | 180 | 150 | -30 | Decrease |
| 157 | 6199 | 1-6968411 | POONA INSTITUTE OF MANAGEMENT SCIENCES AND ENTREPRENEURSHIP | K.B.HIDAYATULLAH ROAD,CAMP,PUNE. | PUNE | Y | N | MANAGEMENT | University of Pune, Pune | POST GRADUATE | MMS | 30 | 0 | -30 | Course Closure |
| 158 | 6203 | 1-9847593 | MARATHWADA MITRA MANDAL'S INSTITUTE OF TECHNOLOGY | S. NO. 35, PLOT NO. 5/6, LOHGAON, PUNE -411032 | PUNE | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | University of Pune, Pune | UNDER GRADUATE | MECHANICAL ENGINEERING | 90 | 60 | -30 | Division Closure |

SINHGAD INSTITUTE OF TECHNOLOGY LONAVALA 410 401

ATTESTED

PRINCIPAL
SINHGAD INSTITUTE OF TECHNOLOGY
Kusgaon (Bk.), Lonavala - 410 401

## Document related to renewal admission capacity for the institute in AY 2021-22

This is to declare that the document related to increase/ decrease of admission intake capacity is received from government of Maharashtra, Higher and Technical education department as per decision number TEM-2021/P.K./125/TASHI-4.

Read: 1) Email from AICTE New Delhi, Dated 10 August 2021

2) Director, Technical Education, Maharashtra State, Mumbai, letter No.2/NGC/Approval/2021/652 , Dated 26/07/2021

According to the approval from AICTE, New Delhi and proposals from Director of Technical Education, the government of Maharashtra issues GR. The GR for Academic year 2021-22 is attached. It exhibits names of the institute in Annexure"A" and Annexure "B". In this GR our institute name is at serial numbers 152& 153 with appropriate permission for increase/decrease of admission intake is approved.

Same GR is made available on Maharashtra state government site www.maharashtra.gov.in whose code is 202108101346589208, Order is passed with digital signature.

This is the english translation of GR in Devnagari

SINHGAD INSTITUTE OF TECHNOLOGY LONAVALA 410 401

ATTESTED

PRINCIPAL
SINHGAD INSTITUTE OF TECHNOLOGY
Kusgaon (Bk.), Lonavala - 410 401